
सर्वमंगल माङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ।।

संस्थापक डी. एन. शिर्के यांचे सर्वाधिक लोकप्रिय प्रकाशन ।। श्री गुरुदेव दत्तात्रेय प्रसन्न ।। मुंबई, पुणे व कोंकण आवृत्ती




शास्त्रशुध्द संपूर्ण वार्षिक पंचांग

# श्री महालक्ष्मी®

सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि., कोल्हापूर

Mahalaxmi.org.in

## १२ डिसेंबर २०२५

मार्गशीर्ष–पौष | श्री शालिवाहन शके १९४७ | विक्रम संवत् २०८२ | शिवशक ३५२ | सौर हेमंत–शिशिर ऋतू | दि.२१ सौर शिशिर ऋतू प्रारंभ | दक्षिणायन–उत्तरायण

### राहू काल

| | |
|---|---|
| रविवार | सायं.४.३० ते ६.०० |
| सोमवार | सकाळी ७.३० ते ९.०० |
| मंगळवार | दुपारी ३.०० ते ४.३० |
| बुधवार | दुपारी १२.०० ते १.३० |
| गुरुवार | दुपारी १.३० ते ३.०० |
| शुक्रवार | सकाळी १०.३० ते १२.०० |
| शनिवार | सकाळी ९.०० ते १०.३० |

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रवि | | मार्गशीर्ष कृ.३ पुनर्वसु<br>**७**<br><br>संकष्ट चतुर्थी<br>चंद्रोदय रात्री ८.३५<br>श्री गणेश मंदिर वर्धापन दिन गिर्ये बांदे ता.देवगड<br>ध्वज दिन मु.१५ | मार्गशीर्ष कृ.१० हस्त *शुक्र लोप*<br>**१४**<br><br>गोंदवलेकर महाराज पु.ति.<br>भगवान पार्श्वनाथ जयंती (जन्मकल्याणक), राधाकृष्ण उत्सव रोहिंजन ता.पनवेल<br>राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन मु.२२ | पौष शु.१ पूर्वाषाढा<br>**२१**<br>उत्तरायणारंभ<br>मकरायन रात्री ८.३२<br>रंगदासस्वामी महाराज पु.ति. क्षेत्र अणे ता.जुन्नर जि.पुणे<br>चंद्रदर्शन जमादिलाखर मु.२९ | पौष शु.८ उत्तरा भाद्रपदा<br>**२८**<br>*दुर्गाष्टमी*<br>शाकंभरीदेवी नवरात्रारंभ<br>पूर्वाषाढार्कः उ.रात्री ६.३०<br>चव्हाटा यात्रा पांग्रड ता.कुडाळ<br>सोमजाई जाखमाता प्रतिष्ठान दिन फळसप ता.म्हसळा मु.७ |
| सोम | मार्गशीर्ष शु.११ रेवती<br>**१**<br>गीता जयंती<br>मोक्षदा एकादशी<br>*मौनी एकादशी(जैन)*<br>माणिकप्रभू उत्सव हुमणाबाद<br>जागतिक एड्स निर्मूलन दिन<br>जमादिलाखर मु.९ | मार्गशीर्ष कृ.४ पुष्य<br>**८**<br>श्री श्रध्दानंदस्वामी पुण्यतिथी<br>मदन महाराज बिहाणी पु.ति. कडा ता.आष्टी जि.बीड<br>संताजी जगनाडे महाराज जयंती सदुंबरे ता.मावळ मु.१६ | मार्गशीर्ष कृ.११ चित्रा<br>**१५**<br>सफला एकादशी<br>रामेश्वर भजन सप्ताह आकेरी ता.कुडाळ, रामेश्वर दहिकाला उत्सव नाटळ ता.कणकवली<br>मूले धनुष्यार्कः उ.रा.४.१९ मु.२३ | पौष शु.२ उत्तराषाढा<br>**२२**<br>श्री नृसिंह सरस्वती जयंती<br>अयन करिदिन, विठ्ठल–रखुमाई जत्रा देवबाग ता.मालवण<br>भारतीय पौष मासारंभ<br>अजमेर उरूस प्रा. रज्जब मु.१ | पौष शु.९ रेवती/अश्विनी<br>**२९**<br>कैवल्याश्रमस्वामी पुण्यतिथी शिवडाव ता.कणकवली<br>श्री रामेश्वर जत्रा सांगवे ता. कणकवली, श्री गवळदेव जत्रा कारीवडे ता.सावंतवाडी मु.८ |
| मंगळ | मार्गशीर्ष शु.१२ अश्विनी<br>**२**<br>*भौमप्रदोष*<br>राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन<br>भावकादेवी वर्धापन दिन पडेल जि.सिंधुदुर्ग, भिंताडे महाराज पुण्यतिथी भिवडी ता.पुरंदर<br>ज्येष्ठार्कः उ.रात्री १.१४ मु.१० | मार्गशीर्ष कृ.५ आश्लेषा<br>**९**<br>अंबरनाथ महाराज पुण्यतिथी सांगुळवाडी ता.वैभववाडी<br>मु.१७ | मार्गशीर्ष कृ.१२ स्वाती<br>**१६**<br>धनुर्मासारंभ<br>स्वामी स्वरुपानंद जयंती<br>पावस, श्री यल्लमा यात्रा जत<br>सोपानकाका पु.ति.सासवड<br>विजय दिन मु.२४ | पौष शु.३ श्रवण<br>**२३**<br>किसान दिन<br>विनायक चतुर्थी मु.२ | पौष शु.१०/११ भरणी<br>**३०**<br>पुत्रदा स्मार्त एकादशी<br>कोणजाईदेवी यात्रा तळा ता. माणगाव, घोडेमुख जत्रा मळेवाड<br>श्री दांडेश्वर यात्रा मालवण<br>खंडोबा यात्रा सांगेली मु.९ |
| बुध | मार्गशीर्ष शु.१३ भरणी<br>**३**<br>जागतिक दिव्यांग दिन<br>महाराजा यशवंतराव होळकर जयंती, देव ब्राह्मण जत्रा आकेरी दांडेचे गाव जि.सिंधुदुर्ग मु.११ | मार्गशीर्ष कृ.६ मघा<br>**१०**<br>मोरया गोसावी संजीवन समाधी चिंचवड पुणे<br>श्री बहादूरशहादेव यात्रा मनू ता.कराड मु.१८ | मार्गशीर्ष कृ.१३ विशाखा<br>**१७**<br>*प्रदोष* पेन्शनर्स डे<br>संताजी जगनाडे महा.पु.ति. सदुंबरे ता.मावळ जि.पुणे<br>बल्लाळ गणेश वाढदिवस प्रभानवल्ली ता.लांजा मु.२५ | पौष शु.४ धनिष्ठा<br>**२४**<br>राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन<br>वासुदेव कुवळेकर महाराज पुण्यतिथी देवरूख<br>पंचक रात्री ७.४५ नं. मु.३ | पौष शु.१२ कृत्तिका<br>**३१**<br>भागवत एकादशी<br>अण्णाबुवा कालगांवकर जयंती पुणे, दासगणू महाराज जयंती गोरटा जि.नांदेड रज्जब मु.१० |
| गुरु | मार्गशीर्ष शु.१४/१५ कृत्तिका<br>**४**<br><br>श्री दत्तात्रेय जयंती<br>पौर्णिमा स.८.३७ ते उ.रात्री ४.४३ पर्यंत, कुलधर्म, अग्रहायणी<br>योगेश्वरी यात्रा अंबाजोगाई<br>भारतीय नौदल दिन मु.१२ | मार्गशीर्ष कृ.७ पूर्वा फाल्गुनी<br>**११**<br>कालाष्टमी, श्री शितळादेवी यात्रा उर्से ता.मावळ जि.पुणे<br>श्री मार्कण्डेय उत्सव कुडाळ जि.सिंधुदुर्ग मु.१९ | मार्गशीर्ष कृ.१४ अनुराधा<br>**१८**<br>शिवरात्री<br>श्री यल्लमा यात्रा कलेढोण ता.खटाव जि.सातारा<br>सेवागिरी महाराज रथोत्सव पुसेगाव जि.सातारा मु.२६ | पौष शु.५ धनिष्ठा<br>**२५**<br><br>ख्रिसमस, नाताळ<br>सांबस्वामी सलगर महाराज पुण्यतिथी कुर्डुवाडी मु.४ | **गोव्यातील उत्सव**<br>दि.३<br>श्री नवदुर्गा जत्रा कुंडई<br>दि.४<br>सांखळी जत्रा, गणपती पंचायतन आल्तू रुमडावाडा वास्को जत्रा, शिवनाथ शिरोडे जत्रा<br>दि.६<br>श्री महालक्ष्मी देवस्थान काला उत्सव पणजी<br>दि.९<br>श्री सातेरी जत्रा आगरवाडा<br>दि.११<br>श्री महालक्ष्मी मंदिर जीर्णोद्धार दिन उत्सव पणजी<br>दि.१९<br>श्री गजांतलक्ष्मी रवळनाथ जत्रा मार्शेल फोंडा<br>दि.२५<br>महामायादेवी जत्रा नेत्रावळी–नुने<br>दि.२५ ते २९<br>श्री शांतादुर्गा कुंकळ्ळीकरीण जत्रोत्सव फातर्पा–केपे |
| शुक्र | मार्गशीर्ष कृ.१ रोहिणी<br>**५**<br>बाळोबा यात्रा राहू ता.दौंड<br>श्री भानोबा यात्रा कुसेगाव ता.दौंड जि.पुणे मु.१३ | मार्गशीर्ष कृ.८ उत्तरा फाल्गुनी<br>**१२**<br>स्वदेशी दिन<br>हुतात्मा बाबू गेनू स्मृतिदिन<br>रामवरदायिनी व नवलाईदेवी यात्रा खावली ता.जि.सातारा<br>भैरवनाथदेव जयंती अपशिंगे (मि.) ता.खटाव मु.२० | मार्गशीर्ष कृ.३० ज्येष्ठा<br>**१९**<br>गोवा मुक्तिदिन<br>दर्श वेळा अमावास्या<br>पहाटे ४.५९ नंतर, ज्ञानेश्वर मोरे माऊली पुण्यतिथी मुंबई<br>श्री तुकारामबाबा जोशी पु.ति.<br>काळबादेवी यात्रा मुंबई मु.२७ | पौष शु.६ शततारका<br>**२६**<br>बांगर षष्ठी<br>तुकारामबाबा जोशी जयंती<br>बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर पुण्यदिन, मसोबा यात्रा प्रारंभ जवळा ता.सांगोला मु.५ | |
| शनि | मार्गशीर्ष कृ.२ मृग/आर्द्रा<br>**६**<br><br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन<br>क्रांति.नाना पाटील पुण्यदिन मु.१४ | मार्गशीर्ष कृ.९ हस्त (२ रा शनि)<br>**१३**<br>सोमजादेवी रथयात्रा श्रीवर्धन<br>आनंदमूर्ती जन्मोत्सव रत्नागिरी<br>शिवडाव यात्रा कणकवली<br>पारशी अमर्दाद मासारंभ मु.२१ | मार्गशीर्ष कृ.३० मूळ<br>**२०**<br><br>संत गाडगेबाबा पुण्यदिन<br>अमावास्या स.७.१२ पर्यंत मु.२८ | पौष शु.७ पू.भाद्रपदा (४ था शनि)<br>**२७**<br>श्री गुरू गोविंदसिंह जयंती<br>स्वामी स्वानंदगिरी पु.ति. मुक्काम खेर्डी ता.चिपळूण मु.६ | |

### तिथीविषयक माहिती

दि.१ पंचक रात्री ११.१८ पर्यंत
रत्नेश्वर वार्षिकोत्सव धामणसे जि.रत्नागिरी
महाबोर्चादेवी जत्रोत्सव अरुळे ता.वैभववाडी
मल्हारी म्हाळसाकांत यात्रा ता.दहीवडी
दि.२ अमृत रात्री ८.५१ पर्यंत
दि.४ गाणगापूर क्षेत्री श्री दत्त जयंती
दत्त नवरात्र समाप्ती, श्रीधरस्वामी जयंती
*अष्टान्हिक पर्व समाप्ती(जैन)*
श्री रेणुका यात्रा सौंदत्ती जि.बेळगाव
कानिफनाथ मूर्ती वर्धापन दिन गिलबिलेनगर पिंपरी–चिंचवड मोशी ता.हवेली जि.पुणे
श्री भैरवनाथ यात्रा चचेगाव ता.कराड
श्री सिध्देश्वर यात्रा सलगरे ता.मिरज
बाबा म.आर्वीकर पु.ति.माचणूर ता.मंगळवेढा
सिध्देश्वर देवस्थान यात्रा मांडवगण ता.श्रीगोंदा
**दि.४ दत्त जयंती उत्सव खालील ठिकाणी**
नृसिंहवाडी ता.शिरोळ, शेणगांव ता.भुदरगड, वेरवली बु।। ता.लांजा जि.रत्नागिरी, क्षेत्र बाजीरे ता.पोलादपूर जि.रायगड, दत्तधाम टोकवाडी ता.परळी वैजनाथ, शिंगवे केशव दत्ताचे ता.पाथर्डी जि.नगर, जगताप मळा कामेरी ता.वाळवा
दि.७ नागोबा यात्रा पालखी म्हसवड ता.माण
दि.११ यल्लमादेवी यात्रा गव्हाण ता.तासगाव
दि.१३ हुतात्मा दिन गारगोटी
सेवागिरी म.पु.ति.उत्सव पुसेगाव जि.सातारा
दि.१४ श्री रंगनाथस्वामी पुण्यतिथी निगडी ता.कोरेगाव जि.सातारा
दि.१६ संक्रांती पुण्यकाल सकाळी ७.०७ ते दुपारी १२.३५
दि.१७ गुळवणी महाराज जयंती सांगली
दि.१९ पांडुरंग ताम्हणकर महा.पु.ति.सांगली
दि.२१ *सौर शिशिर ऋतू प्रारंभ*
चव्हाटा यात्रा फोंडाघाट
दि.२२ अयन पुण्यकाल सूर्योदय ते सूर्यास्त
दि.२८ शांतादुर्गा जत्रा कुंब्रल ता.दोडामार्ग
वाडवळेश्वर यात्रा पाणखोल(जुवे) मालवण
श्री विष्णुदास कवी पुण्यतिथी माहुर
शनीदेव उत्सव राक्षसभुवन(शनी) ता.गेवराई
दि.२९ पंचक सकाळी ७.४० पर्यंत
दि.३० गवळदेव जत्रा खानोली ता.वेंगुर्ला
सातेरी महापुरुष जत्रा शिरवल ता.कणकवली

**शुभ दिवस**–दि.२ शुभ, दि.३ सायं.६.०० प.शुभ, दि.५,६ शुभ, दि.७ मध्यम, दि.८ शुभ, दि.९ दु. २.३२ प.शुभ, दि.१० मध्यम, दि.११,१२,१३ शुभ, दि.१४ मध्यम, दि.१५ शुभ, दि.१६ दु.२.०९ प.शुभ, दि.२१,२२ शुभ, दि.२४ दु.१.१० नं.शुभ, दि.२५ शुभ, दि.२६ दु. २.०० प.शुभ, दि.२७ मध्यम, दि.२८,२९ शुभ

**त्याज्य दिवस**
दि.१,१७,१८,१९,२०,२३,३०,३१

भूमिपूजन मुहूर्त–दि.३,५,६
वास्तू मुहूर्त–दि.५,६
जावळ मुहूर्त–दि.३,५,८,११,१२, दि.१५,२५,२६,२८,२९



साखरपुडा मुहूर्त–दि.२,५,१०,१२,१३, दि.१४,१५,१६,२४,२५,२७,२८,२९
विवाह मुहूर्त–दि.२,५
या महिन्यात उपनयन मुहूर्त नाहीत.

दि.४ श्री दत्तात्रेय जयंती

# सन २०२५ चे सप्तरंगी चित्रमय पंचांग



### जानेवारी २०२५
दि.१२ राजमाता जिजाऊ जयंती
दि.१२ स्वामी विवेकानंद जयंती
दि.१४ मकर संक्रांती

दि.२३ नेताजी जयंती
दि.२६ प्रजासत्ताक दिन


### फेब्रुवारी २०२५
दि.१ श्री गणेश जयंती
दि.४ रथसप्तमी
दि.१२ संत रोहिदास जयंती
दि.१९ छ.शिवाजी महाराज जयंती

दि.२० गजानन महा.प्रकट दिन शेगांव
दि.२३ संत गाडगेबाबा जयंती (तारखेनुसार)
दि.२६ महाशिवरात्री


### मार्च २०२५
दि.१४ धूलिवंदन
दि.१७ शिवजयंती(तिथीनुसार)
दि.१९ रंगपंचमी

दि.३० गुढीपाडवा

दि.३१ रमजान ईद
दि.३१ स्वामी समर्थ प्रकट दिन


### एप्रिल २०२५
दि.६ श्रीरामनवमी
दि.१० श्री महावीर जयंती

दि.१२ हनुमान जयंती
दि.१४ डॉ.आंबेडकर जयंती
दि.१८ गुडफ्रायडे,दि.२० ईस्टर संडे
दि.३० अक्षय्यतृतीया
दि.३० म.बसवेश्वर जयंती

### मे २०२५

दि.१ महाराष्ट्र दिन कामगार दिन
दि.६ राजर्षी छ.शाहू महाराज पुण्यदिन
दि.१२ बुध्द पौर्णिमा

दि.१४ छ.संभाजीराजे जयंती
दि.२६ श्री शनैश्चर जयंती

### जून २०२५

दि.६ किल्ले रायगड येथे शिवराज्याभिषेक सोहळा
दि.७ बकरी ईद
दि.१० वटपौर्णिमा
दि.१७ राजमाता जिजाऊ स्मृतिदिन
दि.२६ राजर्षी छ.शाहू महाराज जयंती

दि.२७ मोहरम,ताबूत बसविणे

### जुलै २०२५
दि.६ देवशयनी आषाढी एकादशी
दि.६ मोहरम,ताबूत विसर्जन
दि.९ महाराष्ट्रीय बेंदूर

दि.१० गुरुपौर्णिमा
दि.१३ वीर शिवा काशीद पुण्यदिन
दि.२९ नागपंचमी
दि.३१ भ.पार्श्वनाथ निर्वाण दिन

### ऑगस्ट २०२५
दि.८ नारळीपौर्णिमा
दि.९ रक्षाबंधन
दि.१५ स्वातंत्र्य दिन

दि.१५ फरवर्दिन

दि.२७ श्री गणेश चतुर्थी

### सप्टेंबर २०२५
दि.२ गौरी–गणपती विसर्जन
दि.५ शिक्षक दिन
दि.५ ईद–ए–मिलाद
दि.६ अनंत चतुर्दशी
दि.१५ अभियंता दिन
दि.२२ घटस्थापना, शारदीय नवरात्रारंभ


### ऑक्टोबर २०२५
दि.२ खंडेमहानवमी
दि.२ विजयादशमी,दसरा

दि.२ म.गांधी जयंती
दि.१८ धनत्रयोदशी
दि.२० दीपावली,नरक चतुर्दशी
दि.२१ लक्ष्मी–कुबेर पूजन

दि.२२ बलिप्रतिपदा दीपावली पाडवा
दि.२३ भाऊबीज

### नोव्हेंबर २०२५

दि.२ प्रबोधिनी भागवत एकादशी
दि.२ तुलसी विवाहारंभ
दि.५ गुरुनानक जयंती


दि.२१ देवदीपावली
दि.२७ संत रोहिदास पुण्यतिथी

### डिसेंबर २०२५

दि.४ श्री दत्तात्रेय जयंती
दि.२० संत गाडगेबाबा पुण्यदिन


दि.२५ ख्रिसमस, नाताळ


## छत्रपती शिवाजी महाराज

### छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र या ग्रंथासंबंधी

श्री. कृष्णराव अर्जुन केळूसकर यांनी १९०६ साली लिहिलेले **छत्रपती शिवाजी महाराज** यांचे एकमेवाद्वितीय व अजरामर असे खरेखुरे चरित्र आम्ही शिवप्रेमींच्या आग्रहास्तव प्रकाशित केलेले आहे. हे चरित्र ज्ञानेश्वरीप्रमाणेच प्रत्येकाचे घरी असावे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे किर्तीस शोभेल असा हा खराखुरा इतिहास सांगणारा चरित्रात्मक ग्रंथ आहे.

सदरचा ग्रंथ आम्ही अतिशय परिश्रम घेऊन प्रकाशित केला आहे. ग्रंथाची **किंमत रु.७००.०० इतकी** असून श्री महालक्ष्मी दिनदर्शिकेच्या ग्राहकांना तो **टपाल खर्च (रु.७५/-) यासहीत रु.६५०.००** या किमतीस पाठविला जाईल. तरी शिवप्रेमींनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा.

संपर्क

सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि.
१०७९/ख–२, ई वॉर्ड, वसंत प्लाझा,
राजाराम रोड, कोल्हापूर–४१६ ००१
दूरध्वनी : (०२३१) २५३०३२५.
www.saraswatibooks.com


## दत्तप्रभूंची पुण्यदायी गिरनार परिक्रमा

अवतारही उदंड होती।
सर्वेचि मागुती विलया जाती।।
तैशी नव्हे श्रीदत्तात्रेयमूर्ति।
नाश कल्पान्ती असेना।।
पूर्ण ब्रह्म मुसावले।
तें हें दत्तात्रेय रूप ओतिलें।।
ज्याचे विलोकनमात्रें तरले।
जीव अपार त्रिभुवनीं।।
(श्रीधरस्वामीकृत रामविजय
१३–२१–११२)

अशा दत्तात्रेयांच्या दर्शनाला श्रध्दाळू मन व्याकुळ न झाले तर नवलच! दत्तोपासनेचे सातत्य हे दत्तक्षेत्रांच्या महतीमुळे राखले गेले आहे. त्यात प्रत्यक्ष दत्तदेवतेमुळे निर्माण झालेली दत्तक्षेत्रे आणि दत्तावतारी विभूतींच्या संपर्कामुळे निर्माण झालेली दत्तक्षेत्रे असे दोन प्रकार आहेत. त्यातील पहिल्या प्रकारात मोडतो तो 'गिरनार'. दत्तात्रेयांच्या सगुण रूपातील उपासनांपैकी एक म्हणजे दत्तात्रेयांच्या पादुकांची उपासना आणि प्रत्यक्ष तेजोमयी दत्ताचे अखंड अक्षय निवासस्थानी त्या पादुका असायलाच हव्यात. गिरनारच्या पाच शिखरांपैकी एका शिखरावर त्या 'गुरुपादुकां'चे भाविकांना दर्शन होते. अनंतसुत विठ्ठलाने 'दत्तप्रबोध' नावाच्या ग्रंथात पुढीलप्रमाणे गिरनारचे वर्णन केले आहे.


एका शृंगावरी गोरक्षनाथ।
दुसरे शृंगावरी हिंगळजादेवी बसत।।
तिसरे शृंगावरी स्वयें अवधूत।
विश्रांती घेत हिंडतां।।
नवनाथ चौऱ्यांशी सिध्द।
येथें वसति गा प्रसिध्द।।
दत्त अविनाश तूं स्वतां सिध्द।
अद्वय अभेद्य सर्वातीत।।
हिंदू आणि मुसलमान।
यासाठी रूपे दोन।।
दत्त दातार अभिमान।
द्वयस्थान शोभविलें।।

पश्चिम भारतात गुजरात राज्यात अरवली पर्वताच्या नैऋत्येस गिरनारचे डोंगर आहेत. भौगोलिकदृष्ट्या अनेक छोट्या–मोठ्या पर्वतांचा, शिखरांचा आणि सुळक्यांचा समूह म्हणजे गिरनार. गिरनार पर्वताची उंची साधारण १,१०० मीटर किंवा ३,६०० फूट आहे. हा पर्वत हिमालयापेक्षाही जुना मानला जातो. जुनागढपासून ४ कि.मी. अंतरावर गिरनारचा पायथा लागतो, तलेठी. जुनागढपर्यंत जाण्यासाठी सूरत, बडोदा, अहमदाबाद या शहरांतून नियमित बससेवा उपलब्ध आहे. रेल्वेने जाणाऱ्या भक्तांसाठी सूरत, अहमदाबाद, राजकोट, जुनागढ अशी रेल्वेसेवा आहे. विमानप्रवाश्यांसाठी केशोड विमानतळ हा उत्तम पर्याय आहे, जिथून गिरनार केवळ ४० कि.मी. अंतरावर आहे.

गिरनार पादुका दर्शन आणि गिरनार परिक्रमा अशा दोन पध्दतींनी गिरनार दर्शन करता येते. गिरनार पादुका दर्शनासाठी ९,९९९ पायऱ्यांची चढाई पूर्ण करावी लागते, तर गिरनार परिक्रमेसाठी ३८ कि.मी.चा पल्ला पूर्ण करावा लागतो.

गिरनार पादुका दर्शन आणि गिरनार परिक्रमेला जाताना पुढील गोष्टी ध्यानात घेणे आणि करणे आवश्यक आहे.

* साधारणतः १०–१२ तासांत गिरनार चढून उतरून पूर्ण होतो. साधारणपणे हिवाळ्यामध्ये म्हणजेच ऑक्टोबर ते फेब्रुवारी या कालावधीत गिरनार दर्शन करणे जास्त योग्य राहील.
* दहा हजार पायऱ्या चढून जाणे हे परिक्रमा करणाऱ्यांसाठी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या कसोटी पाहणारे आहे.
* पहिल्या पायरीवर डोके ठेवून (नतमस्तक होऊन) दत्त महाराजांना शरण जावे व आपल्याला वर त्यांच्यापर्यंत घेऊन जाण्याची विनंती करावी.
* लांब पल्ल्याच्या चालण्यासाठी पायात शक्यतो स्पोर्टस् शूज असावेत.
* शारीरिक क्षमतेसाठी २–३ महिने भरपूर चालणे आणि इतर व्यायाम करावा.
* बुटाच्या आत शक्यतो सॉक्स असावेत, जेणेकरून थंडी कमी भासेल.
* पर्वतावर चढाई करणेस रात्री ११ ते १२ च्या दरम्यान सुरुवात करावी.
* स्पोर्टस् वेअर घातल्यास उत्तम. सुटसुटीत आणि संरक्षक कपडे– जसे की स्वेटर आणि कानटोपी सोबत असावेत. साधारण सहा हजार पायऱ्या चढेपर्यंत पहाटेचा गार वारा सुटलेला असतो, तेव्हा अशा गोष्टींचा खूप उपयोग होतो.
* पर्वताच्या पायथ्याशी काठी मिळते, जी चढताना नाही तर उतरताना खूप उपयोगी ठरते.
* पादुका दर्शनासाठी डोलीची व्यवस्था आहे. सरकार नियुक्त दरपत्रक आहे. वजनाप्रमाणे पैसे ठरवले जातात. या सोईंचा लाभ घेण्यास काहीही कमीपणा नाही, हे लक्षात ठेवून आवश्यकता असल्यास या पर्यायांचा वापर करावा.
* गोरक्षनाथ मंदिर सोडल्यानंतर एकही दुकान नाही. तसेच पादुकांच्या ठिकाणी हार, फुलेही मिळत नाहीत. त्यामुळे जे काही देवाला अर्पण करावयाचे आहे ते आणि कोरडा प्रसाद आपल्या जवळील सामानात वेगळ्या कप्प्यात ठेवावा.



* पादुकांचे दर्शन झालेवर खाली कमंडलू तीर्थ येथे आवर्जून प्रसाद घ्यावा. जेणेकरून अंगात उत्साह आणि ताकद शिल्लक राहील. कारण पुढे अजून दोन हजार पायऱ्या चढायच्या असतात.
* जमेल तेथे यथाशक्ती धनसमर्पण, दानधर्म नक्की करावा. जेणेकरून तेथे सेवा देणाऱ्या सेवेकऱ्यांसाठी ते आवश्यक आहे.

गिरनार पादुका दर्शन करण्यासाठी पायऱ्या पार करत असताना भाविकाने आपल्या ठायी वसत असलेल्या प्रत्येक दुर्गुणाचा त्याग करत आपण पायरीगणिक ईश्वराजवळ जात आहोत, अशी कल्पना करून अखंड नामस्मरण करायचे असते. शेवटच्या पायरीला पोहचेपर्यंत आपण त्याग करीत आहोत या भावनेचाही त्याग केल्यास 'मीपणा' गळून पडतो आणि हीच गिरनार दर्शनाची फलश्रुती आहे.

गिरनार परिक्रमेला मात्र डोलीचा पर्याय उपलब्ध नसतो. ही परिक्रमा केवळ पायी करता येते. गिरनार पर्वत उजव्या हाताला ठेवून त्याला प्रदक्षिणा घालणे, म्हणजेच गिरनार परिक्रमा होय. ही अति पुरातन काळापासून चालू आहे आणि ती कठीणही आहे. कारण गिरनारच्या आजूबाजूला जंगल आहे. परिक्रमा केवळ कार्तिकी एकादशी ते त्रिपुरारी पौर्णिमा या पाच दिवसांतच करता येते. जंगल आणि मार्ग वनखात्याच्या अखत्यारीत येतात. जंगलात अनेक प्रकारचे हिंस्त्र प्राणी आहेत. याच काळात देव आणि त्यांचे गणसुध्दा परिक्रमेला येतात असे म्हटले जाते. परिक्रमेची वाट बिकट असून पूर्णपणे जंगलातून जाते. तीन डोंगर चढून उतरताना तीव्र आणि अति तीव्र उतार लागतात. केवळ श्रध्दा आणि भक्ती या जोरावर काटेकुटे आणि दगडांनी भरलेला मार्ग भक्त हसत हसत पार करतात.

जुनागढमधील गिरनारच्या पायथ्याशी असलेल्या तलेठीमधील भवनाथ येथील दुधेश्वर मंदिरापासून गिरनार परिक्रमेस प्रारंभ होतो. परिक्रमेचा मार्ग पूर्णपणे जंगलातून जातो. परिक्रमा सुरू झाल्यावर जो पहिला चढ लागतो त्याला 'जवानी की घोडी' म्हणतात. ती चढून गेल्यावर 'जिना बाबा की मढी' लागते, जी परिक्रमा सुरू केल्यानंतर १२ कि.मी. अंतरावर आहे. तिथेच बाजूला एक हनुमान आणि कालिकेचे मंदिरही आहे. मागील शतकामध्ये तिथे जिना बाबा नावाचे एक अवलिया होऊन गेले. त्यांची एक चिलीमही अजून तिथे आहे आणि ते त्यातून ये–जा करतात, असे श्रध्दाळू म्हणतात. त्यांची समाधी आणि धुनीसुध्दा तिथे आहे. परिक्रमा करणाऱ्यांसाठी तिथे गरमागरम भोजन संस्थानद्वारे उपलब्ध असते. शेकडो सेवेकरी यासाठी विनामोबदला राबत असतात. थोडे पुढे गेल्यानंतर 'सरनो' नावाची एक छोटी नदी लागते, जिच्यामध्ये अनेकजण स्नान करतात. तिथून पुढे ८ कि.मी. अंतरावर 'मालवेला' हे स्थान लागते. मालवेलाला गिरनार पर्वताचा मध्य समजला जातो. येथे आंब्याची खूप झाडे आहेत. मालवेलाहून पुढे साधारण ८ कि.मी.वर बोरदेवी मंदिर लागते. मुख्य मार्गापासून १ कि.मी. आत चालत जावे लागते आणि तेवढेच अंतर परत यावे लागते. तरीही अनेक भाविक श्रध्देपोटी तिथे जातात. बोरदेवी मंदिर हे एक अत्यंत रमणीय स्थळ असून मंदिरातील विग्रह नितांत सुंदर आहे. इथून पुढे परिक्रमेचा शेवटचा १२ कि.मी.चा टप्पा सुरू होतो. साधारण ७ कि.मी. पुढे गेल्यानंतर खोडियार मातेचे मंदिर लागते. ज्यांनी बोरदेवीचे दर्शन घेतले नाही, त्यांनी हिचे दर्शन घेतले तरी चालते असे लोक म्हणतात. ते अगदीच रस्त्यात असल्या कारणने पायी प्रवास वाचतो. शेवटच्या टप्प्याचा प्रवास पुन्हा भवनाथ मंदिराजवळ येऊन थांबतो.

रस्त्यात अनेक ठिकाणी लंगर, खाण्या–पिण्याचे ठेले आता दिसतात. तिथे माफक दरात किंवा मोफत सर्व उपलब्ध असते. केवळ सेवाभाव ठेवून परिक्रमा करणाऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून अनेक लोक आदरातिथ्य करतात. पाणी, इतर पेय आणि खाद्यपदार्थांची सेवा देतात. ते पाहून खरोखर नतमस्तक व्हायला होते. हसनपूर धरणाशेजारील जिना बाबाच्या मढीत अनेक भाविक रात्र काढतात. आणि मग दुसरे दिवशी उरलेल्या प्रवासाला आरंभ करतात. अनेकजण १२ ते १४ तासांत हा प्रवास करतात, तर काहीजण २ ते ४ दिवसात करतात. ज्याच्या–त्याच्या चालण्याच्या वेगावर आणि शारीरिक क्षमतेवर परिक्रमेचा कालावधी अवलंबून असतो.

पर्वतावर अनेक प्रकारचे वृक्ष, प्राणी, देवस्थाने, कुंडे आणि स्वच्छ जलमय पवित्र तीर्थे आहेत. हरकेश्वराचे मंदिर, अंबादेवीचे मंदिर, दामोदर कुंड, मृगीकुंड, भीमकुंड तीर्थ, कमंडलू तीर्थ, भुवनेश्वर मंदिर, मुचकुंद गुहा, नरसिंह मेहतांचे स्मृतिस्थान इ. अनेक दर्शनीय स्थळे आहेत. पर्वतावर अनेक गुहांमध्ये व गुप्त ठिकाणी साधू, सिध्द, योगी अनुष्ठानाला आणि योगसाधनेला बसतात. त्यांना युगांचे ध्यान नसते. याशिवाय ३३ कोटी देवांचाही येथेच निवास आहे, अशी मान्यता आहे. गिरनार परिक्रमा ही ३३ कोटी देव आणि दत्तात्रेय यांना प्रदक्षिणा करणे होय. आणि म्हणूनच सदर परिक्रमा ही अत्यंत पुण्यदायी मानली जाते.

'दत्तगुरू गिरनारी भरोसा भारी' अशी अखंड गर्जना जिथे ऐकू येते, अशा गिरनारवर दत्तात्रेयांचा प्रत्यय भक्तांना नेहमीच येतो.

।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।


– परिज्ञा भी. पुरी, पुणे
मोबा. : ९११२३३२३२३



**इशारा–** या कॅलेंडरमधील यात्रा, उत्सव इ. कोणताही मजकूर कॅलेंडर काढणेसाठी कोणालाही पूर्व परवानगीशिवाय वापरता येणार नाही. सदरची माहिती वापरून कोणीही पंचांग दिनदर्शिका, कॅलेंडर छापलेस त्यांचे प्रकाशक, डी.टी.पी. सेंटर तसेच ज्या प्रेसमध्ये छपाई केलेली असेल त्या सर्वांचेवरती कॉपीराईट तसेच ट्रेडमार्क ॲक्टखाली फौजदारी गुन्हा दाखल करून कडक कारवाई करणेत येईल. – प्रकाशक